IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# "गाथासप्तशती" मधील स्त्री जीवन

**श्री.सोमशेखर नागेश होरटटी,**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा व
सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*गाथासप्तशती*
*स्त्री जीवन*

**ABSTRACT**

प्राकृत साहित्यात प्राचीन काळापासून म्हणजेच आगम ग्रंथ रचनेपासून मुक्त काव्य लिहिले जात असलेले दिसून येते कारण आगम साहित्यात अनेक ठिकाणी उपदेश, नैतिकता इत्यादींचे वर्णन करण्यासाठी रसयुक्त पद्यांचा उपयोग केला जात असलेला दिसून येतो. त्यातूनच मुक्त काव्य रचना करण्याची पद्धत अस्तित्वात आलेली असावी.इ.स. दुस-या, तिस-या शतकात होऊन गेलेल्या सातवाहन वंशीय राजा 'हाल' यांनी "गाथासप्तशती" नावाचे प्रथम मुक्त काव्याचे संपादन केले. त्यानंतर जयवल्लभानी ' वज्जालग्गं' नावाचे मुक्त काव्य लिहिले. मुक्त काव्य म्हणजे संस्कारांचा, संस्कृतीचा एक मौल्यवान ठेवाच होय. यामध्ये सुवचनांचा, उपदेशांचा, मार्गदर्शनाचा, संत-सत्पुरुषाच्या आचार विचारांचा, संग्रह असतो. त्यामुळेच कोणत्याही साहित्यात मुक्त काव्याचे महत्त्व अधिक असलेले दिसून येते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Horatti, S. N. (2025). "गाथासप्तशती" मधील स्त्री जीवन. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2596–2599.

**प्रस्तावना**

प्राकृत साहित्यात प्राचीन काळापासून म्हणजेच आगम ग्रंथ रचनेपासून मुक्त काव्य लिहिले जात असलेले दिसून येते कारण आगम साहित्यात अनेक ठिकाणी उपदेश, नैतिकता इत्यादींचे वर्णन करण्यासाठी रसयुक्त पद्यांचा उपयोग केला जात असलेला दिसून येतो. त्यातूनच मुक्त काव्य रचना करण्याची पद्धत अस्तित्वात आलेली असावी.इ.स. दुस-या, तिस-या शतकात होऊन गेलेल्या सातवाहन वंशीय राजा 'हाल' यांनी "गाथासप्तशती" नावाचे प्रथम मुक्त काव्याचे संपादन केले. त्यानंतर जयवल्लभानी ' वज्जालग्गं' नावाचे मुक्त काव्य लिहिले. मुक्त काव्य म्हणजे संस्कारांचा, संस्कृतीचा एक मौल्यवान ठेवाच होय. यामध्ये सुवचनांचा, उपदेशांचा, मार्गदर्शनाचा, संत-सत्पुरुषाच्या आचार विचारांचा, संग्रह असतो. त्यामुळेच कोणत्याही साहित्यात मुक्त काव्याचे महत्त्व अधिक असलेले दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) प्रथम शतकातील ग्रामीण जीवनाच्या वर्णनाबरोबर नयन मनोहर वाटणा-या नद्यांचे वर्णन, पर्वतांचे वर्णन यांचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण समाजातील रूढी, परंपरा, सण, उत्सव इत्यादींचे अध्ययन करणे.

३) मानवी जीवनातील विविध घटनांचा अभ्यास करणे.

४) हाल राजाने द्वितीय शतकात आपल्या कल्पनांच्या शक्तीच्या आधारावर केलेल्या वर्णनांचे महत्त्व स्पष्ट करणे.

५) प्राकृत मुक्त काव्याची उपयुक्तता स्पष्ट करणे

**व्याप्ती :-**

प्रस्तुत विषयाची व्याप्ती गाथासप्तशती हा मुक्त काव्य ग्रंथ असून त्याचे महत्त्व, उपयुक्तता स्पष्ट करण्यापुरतीच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत विषयाचे संशोधन पद्धती वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

**विषय विवेचन-**

**१) प्रथम शतकातील भौगोलिक आणि ग्रामीण जीवनाचे वर्णन :-**

गाथासप्तशती या ग्रंथाची निर्मिती होण्यापूर्वी जे अनेक ग्रंथ निर्माण झाले त्यामध्ये राजे, राजवाडे, नगर व प्रतिष्ठित समाजातील लोकांचीच वर्णने आलेले दिसून येतात. शिवाय ही वर्णने लोकांच्या बोली भाषेमध्ये व लोकांना समजेल अशा भाषेमध्ये न करता संस्कृत भाषेमध्ये केली जात असलेली दिसून येतात. परंतु गाथासप्तशतीमध्ये ग्रामीण जीवनात राहणा-या लोकांचे, त्यांच्या संस्कृतीचे, रूढी परंपरांचे वर्णन करण्यात आलेले दिसून येतात. गाथासप्तशतीमध्ये राहणारा समाज खेड्यात, वाडीत, पर्वत, द-याखो-यात, अरण्यात भटकणारा, शेती करणारा, शिकार करणारा असा असलेला दिसून येतो.

पहिल्या गाथेमध्ये आपल्या पतीची प्रत्येक इच्छा पूर्ण करणारी नायिका दिसून येते तर आपल्या एकत्र कुटुंबासाठी विविध प्रकारचे दुःख सहन करणा-या स्त्रियांचे वर्णन आलेले आहे. दुस-या गाथेत पतीच्या नंतर व्यभिचार करणारी नायिका दिसून येते. या ग्रंथात वर्णिलेला समाज हा विविध जाती, धर्मामध्ये विखुरलेला दिसून येतो तर शहरी लोकांच्या प्रमाणे यामध्ये भांडण, भयग्रस्त अवस्था किंचितही दिसत नाही. उदरनिर्वाह करणे हा एकच प्रमुख उद्देश दिसतो. त्यांची उदरनिर्वाह करण्याची साधने शेती व निसर्गातील विविध वस्तू गोळा करणे हाच असल्याने या समाजामध्ये एकत्र कुटुंब पद्धती असलेली दिसून येते.

**निसर्ग वर्णन :-**

या ग्रंथातील निसर्ग वर्णन म्हणजे कवी कल्पनेतून व कवींच्या प्रतिभावंत शैलीतून चित्रित झालेले दिसून येते. कवींची कल्पनाशक्ती म्हणजे एक अखंडपणे वाहणारा प्रवाह वाटतो. या निसर्ग वर्णनामध्ये भौगोलिक परिस्थिती वृक्षवेली, पशुपक्षी, शेती, मेघगर्जना, मेघवृष्टी इत्यादी मधून कवींनी निसर्ग वर्णन हुबेहूब चित्रित केलेली दिसून येते.

पावसाचे वर्णन करताना नव मेघातून सतत पडणा-या जलधारारूपी दो-याने बांधलेल्या पृथ्वीला प्रयत्नपूर्वक वरती उचलण्यास असमर्थ्य ठरलेले ढग जणू ओरडत पडत आहेत पृथ्वीच्या भोवती काळया - पांढ-या ढगांचा समुदाय जमा झालेले दृश्य पाहून जणू दूध व दही चोरून खात असलेला व खाताना अंगावर सांडलेल्या कृष्णाची उपमा पर्वतास देण्यात आलेली आहे अशा प्रकारे निसर्ग वर्णन करणा-या अनेक गाथा या ग्रंथात आलेल्या दिसून येतात.

**समाज वर्णन :-**

गाथासप्तशती मध्ये असलेला समाज ग्रामीण भागात राहणारे, शहरी संस्कृती पासून दूर असणारे व या समाजाचे जीवन पूर्णतः निसर्गाच्या लहरीवर अवलंब असणारे दिसून येते. उष्णकटिबंधात राहणा-या समाजामध्ये विंध्य पर्वत, सह्याद्रीचा पूर्व भाग, नर्मदा, तापी, गोदावरी यांचे वर्णन आहे तर वृक्षांमध्ये आम्र, निंब, वटवृक्ष व बोर या मोठ्या झाडांचा उल्लेख मिळतो तर बकुळ फुलांचा उल्लेख मिळतो. गाथा सप्तशतीमधील समाज हा ग्रामीण भागात राहणारा आहे तसा तो दैववादी दिसून येतो. यामध्ये अग्नि, इंद्र, कृष्ण, शंकर इत्यादी प्रमुख देवांचा उल्लेख दिसलेला दिसून येतो. मंदिरासाठी देऊळ, देवघर इत्यादी विविध नावे आलेली दिसून येतात. दैववादाप्रमाणे भूत, जादूटोणा, जन्म मृत्यु, पुनर्जन्म, इत्यादीवर त्यांची श्रद्धा असलेले दिसून येते

गाथासप्तशतीमधील वैवाहिक जीवनामध्ये बालविवाहाचे एकही उदाहरण ग्रंथात आलेले दिसून येत नाही. गाथासप्तशती मधील वर्णिलेला समाज हा मोकळ्या वातावरणात वाढलेला निरोगी दुष्ट प्रवृत्ती पासून दूर असलेला, सुखी समाधानी असलेला दिसून येतो.

गाथा सप्तशतीच्या द्वितीय शतकामध्ये काळ व शिर्षक यांचे वर्णन आलेले दिसून येते.

गाथा सप्तशतीच्या तृतीय शतकात विविध प्रकारा मधील नायिकांचे वर्णन आलेले दिसून येते.

**१) क्रोधिष्ठ नायिका-**

ज्याप्रमाणे आपल्या पतीवर किंवा प्रियकर अत्यंत प्रेम करणा-या नायिका आहेत. त्याप्रमाणे पतीवर, प्रियकरावर क्रोधिष्ठ होणा-या नायिकांचे वर्णन आलेले दिसून येते. तर काही नायिका आपल्या पती किंवा प्रियकरावर मौन धारण करणे, झोपेचे सोंग घेणे इत्यादी विविध प्रकारांनी प्रकट झालेली दिसून येतात. आपल्या नायिकेचे क्रोध कमी होण्यासाठी तिची विविध प्रकारे मनधरणी करत असलेली एवढेच नव्हे तर पायावरती लोटांगण घेणारे पती, प्रियकराचे वर्णन आलेले दिसून येते. तरीही आपला क्रोध न सोडणा-या नायिका अनेक गाथातून स्पष्ट होतात. तर त्यांच्या उलट प्रियकरावर आपला क्रोध विसरून आनंदाने स्वागत करणा-या तसेच डोळे मिटून घेणा-या अपराधास मनातच क्षमा करून त्यांचे स्वागत करणा-याना नायिका दिसून येतात.

**२) धाडसी नायिका -**

पुरुषांच्या पेक्षाही काही बाबतीत या नायकांचे धाडस अधिक असलेले दिसून येते. या नायिका गोदावरीच्या नदीमध्ये अंघोळ करण्यासाठी जात असलेल्या, पावसाळ्यात भरून वाहणारी नदी पार करून रात्री आपल्या प्रियकरास भेटण्यासाठी जाणारी व गोदावरीच्या किना-यावरील कुंज वनात दिलेले संकेत ठिकाण चुकल्यामुळे शोध घेत रात्रभर निर्भयपणे फिरत असलेल्या अशा विविध नायिका दिसून येतात या नायिका अत्यंत धाडसी असलेल्या तरी पतीच्या इच्छेविरुद्ध किंवा कोणत्याही मर्यादेचे उल्लंघन न करणा-या पतीच्या इच्छेप्रमाणे आचरण करणा-या दिसून येतात.

**३) मुग्धा नायिका -**

मुग्धा म्हणजे धाडसी नायिकेच्या अगदी विरोधी आचरण असणारी नायिका होय. मुग्धा म्हणजे सभ्य, समंजस, कुलीन होय. ती क्रोध झाली तरीही विनम्रपणे आचरण करून सर्वांच्या मनामध्ये आपल्याविषयी आदरभाव निर्माण करते. मुग्धा नायकेच्या आचरणामध्ये किंचितही ढोंगीपणा, नाटकीपणा, असत्य वचन इत्यादी सारख्या दृष्ट आचरणापासून पूर्णतः दूर असते. मुग्धा नायिका पतीच्या केवळ सहवासाने आनंदित होणारी, घरातील सर्वांच्या साठी कष्ट करणारी, व्यर्थ बडबड न करणारी, मोजक्या शब्दात निर्णय देणारी, अपराधास क्षमा करणारी अशा विविध गुणांनी युक्त असलेले दिसून येते.

**४) कुलवधू नायिका -**

कुलवधू च्या आचरणास गंगेच्या प्रवाहाची उपमा दिलेली दिसून येते. कुलवधू नायिका अत्यंत संयमी, शांत, भयभीत न होणारी, संकटाचे आव्हान स्वीकारणारी, नाटकी पणा, अलंकाराचा अभाव असलेली दिसून येते. लहान मोठ्या संकटात दूरदृष्टीने आचरण करणारी व त्यामध्ये यश प्राप्त करणारी नायिका दिसून येते. एकत्र कुटुंबात सर्वांच्या आदरास, प्रेमाचा पात्र असलेली, दोषी व्यक्तींना क्षमा करणारी अशी नायिका दिसून येते. पतीच्या सुखदुःखात रममान होणारी पतीचे दारिद्र्य पाहून आपल्या इच्छा, आकांक्षा प्रकट न करता मनामध्ये ठेवणारी अशा विविध गुणांनी युक्त असलेल्या कुलवधूचे वर्णन या ग्रंथांमध्ये आलेले दिसून येते.

**निष्कर्ष :-**

स्त्री ही समाजाचा आधारस्तंभ आहे. पूर्वी स्त्रीला घरगुती कामामध्ये आणि व्रतवैकल्यामध्ये बांधून ठेवले जात होते.

एकविसाव्या शतकातील स्त्री ही स्वावलंबी, शिक्षत, आत्मविश्वासू आणि बहु आयामी आहे. जी पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडून शिक्षण, नोकरी, व्यवसाय अशा विविध क्षेत्रात नेतृत्व करत आहे. तरी ही तिला रुढी, परंपरा यांना सामोरे जावे लागत आहे. ती कुटुंबाची जबाबदारी स्वीकारते.

स्त्रीने तिचे नवे रूप जगाला दाखवून दिले आहे. 21व्या शतकात फक्त चूल आणि मुलं अशी परिस्थिती नसून त्यांनी अनेक छोटे छोटे उद्योग घरच्या घरी सुरू केले आहेत. आपल्या हक्कासाठी लढणारी, आधुनिक विचारांची आजची स्त्री आहे. सकारात्मक बदल घडवत असताना दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१)हाल विरचित गाहासत्तसई, प्रकाशन -अभिनंदन, संपादक - डॉ. पी.बी.बडीगेर म्हैसूर - १९६९.

२)गाहासत्तसई – कवी हालरचित प्रकाशन – शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
संपादक – प्रा. एस.सी. पाटील २००४

३)प्राकृत साहित्याचा इतिहास :- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर- २००९.

४)विकीपिडिया

*************************************************************************